# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 18 January 2025
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – १८ जानेवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- ई प्रॉपर्टी कार्ड हा फक्त दस्तऐवज नव्हे आर्थिक सुरक्षेची हमी–पंतप्रधानांचं प्रतिपादन
- मुंबईकरांना आता एकाच तिकिटावर लोकल, बेस्ट, मेट्रो आणि मोनो प्रवास करता येणार
- गड किल्ल्यांवरील अतिक्रमण काढण्यासाठी जिल्हास्तरीय समित्यांचं गठन
- राज्यातल्या जवळपास ४ हजार अपात्र महिलांची लाडकी बहीण योजनेतून माघार

आणि

- आयसीसी अजिंक्यपद चषकासाठी रोहित शर्माच्या नेतृत्वात भारतीय क्रिकेट संघ जाहीर

****

स्वामित्व योजनेअंतर्गत दिली जाणारी ई प्रॉपर्टी कार्ड हा केवळ दस्तऐवज नसून आर्थिक सुरक्षेची हमी असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. स्वामित्व योजनेअंतर्गत गाव पातळीवर जमिनीच्या मालकी हक्कांविषयी संपूर्ण माहिती देणाऱ्या ई प्रॉपर्टी कार्ड अर्थात मालमत्ता सनद वितरण कार्यक्रमाला आज पंतप्रधानांच्या हस्ते प्रारंभ झाला, त्यावेळी ते बोलत होते. स्वामित्व योजनेमुळे छोट्या गावांना होणाऱ्या लाभाबद्दल पंतप्रधान म्हणाले –

***स्वामित्व योजना से गांव के विकास की प्लानिंग और उस पर अंमल अब काफी बेहतर हो रहे है। आज हमारे पास स्पष्ट नक्शे होंगे, तो विकास काम की प्लानिंग भी सटीक होंगी। अब प्रॉपर्टी राईटस् मिलने से ग्राम पंचायतों की मुश्किलें भी दूर होंगी।***

या योजनेअंतर्गत आतापर्यंत ३ लाख १७ हजार गावांमध्ये ड्रोन सर्वेक्षण पूर्ण झालं असून, दीड लाखांपेक्षा जास्त गावांसाठी सव्वा दोन कोटी प्रॉपर्टी कार्ड्स तयार करण्यात आली आहेत. आज झालेल्या या कार्यक्रमात देशभरातली दहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशातल्या पन्नास हजाराहून अधिक गावांतली ६५ लाख ई–प्रॉपर्टी कार्डस् पंतप्रधानांच्या हस्ते वितरित करण्यात आली. यावेळी त्यांनी ठिकठिकाणच्या लाभार्थ्यांशी दूरदृष्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून संवाद साधला. यामध्ये नागपूरचे रोशन पाटील यांचाही समावेश आहे.

या कार्यक्रमात राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मुंबईत सह्याद्री अतिथीगृहातून ऑनलाईन पद्धतीने सहभागी झाले. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात मालमत्ता सनदींचं वाटप करण्यात आलं.

महाराष्ट्रातल्या १५ हजार गावांमध्ये या कार्डांचं वाटप होणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या योजनेबाबत बोलतांना, गावापासून अपेक्षित असलेली विकासाची घोडदौड या योजनेच्या माध्यमातून सुरू झाल्याचं सांगितलं, ते म्हणाले –

***स्वामित्व योजना जी आहे, प्रॉपर्टी कार्ड वाटप, ही अतिशय ऐतिहासिक योजना आहे. खऱ्या अर्थाने गावापासून आपली विकासाची जी काही घोडदौड सुरू झाली पाहिजे, ग्राम समृद्धी – गाव समृद्ध झालं तर देश समृद्ध होतो. आणि म्हणून देशाचा विकास करायचा असेल तर गावापासून आपण सुरवात केली पाहिजे. आणि ती सुरूवात खऱ्या अर्थाने आजच्या या कार्यक्रमाने झालेली आहे. मोठ्या प्रमाणात ही प्रक्रिया सुरू राहील. महाराष्ट्रातल्या देखील लाखो लोकांना याचा फायदा होईल.***

छत्रपती संभाजीनगर इथं सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट आणि इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या उपस्थितीत, नांदेड इथं खासदार अशोक चव्हाण यांच्या उपस्थितीत, परभणी इथं राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या उपस्थितीत, तर अहिल्यानगर इथं जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात मालमत्ता सनद वाटप करण्यात आलं.

****

तंत्रज्ञानाच्या वापरामुळे आरोग्य क्षेत्रात क्रांती घडणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. मुंबईत वांद्रे कुर्ला संकुलातील जिओ कन्व्हेन्शन सेंटरमध्ये 'पॅन आयआयटी वर्ल्ड ऑफ टेक्नॉलॉजी २०२५' परिषदेच्या उद्घाटन सत्रात ते आज बोलत होते. ग्रामीण आणि दुर्गम भागात डॉक्टर पोहोचणं शक्य नसलेल्या ठिकाणचे रुग्ण तंत्रज्ञानाच्या माध्यमातून डॉक्टरांपर्यंत पोहोचू शकणार असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं.

****

मुंबईकरांना आता एकाच तिकिटावर उपनगरी रेल्वे, बेस्ट बस, मेट्रो, मोनो आणि एसटीने प्रवास करता येणार आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी चर्चा केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत ही माहिती दिली. या मंचाद्वारे लाखो मुंबईकरांचा प्रवास सुकर होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. ते म्हणाले –

> ***आत्तापर्यंत मेट्रो, बेस्ट, असे सगळे ट्रान्सपोर्ट सिस्टीम प्लॅटफॉर्मवर आणले होते. आपली सबअर्बन रेल्वे देखील त्याच्यावर आणणं गरजेचं होतं, कारण ती मुंबईची लाईफ लाईन आहे. आज त्याला ही मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे आता मुंबईच्या लोकांना सगळ्या ट्रान्सपोर्टेशन सिस्टीम्स एका प्लॅटफॉर्मवर, एका तिकीटावर वापरता येतील.***

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११८ वा भाग असेल. या महिन्याच्या शेवटच्या रविवारी प्रजासत्ताक दिन असल्यामुळे या महिन्यात हा कार्यक्रम उद्या होत आहे.

****

गड किल्ल्यांवरील अतिक्रमण काढण्यासाठी आणि रोखण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हास्तरीय समिती गठित केल्याची माहिती महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी आज दिली. ते मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. राज्यातले किल्ले आणि गडावर अतिक्रमण होत असल्याचं सरकारच्या निदर्शनास आलं होतं. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार ही समिती गठित करण्यात आली आहे. या समितीत पोलीस आयुक्त, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, महानगरपालिका आयुक्त, मुख्याधिकारी, वनक्षेत्र असेल तिथे उप वनसंरक्षक, भारतीय पुरातत्व भारत सरकार, यांचा समावेश असेल.

****

राज्यातल्या जवळपास ४ हजार अपात्र महिलांनी लाडकी बहीण योजनेतून माघार घेतली असल्याची माहिती, महिला आणि बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. या महिलांनी परत केलेले पैसे विविध कल्याणकारी योजनांसाठी वापरले जाणार आहेत. तक्रार प्राप्त झालेल्या इतर लाभार्थ्यांच्या अर्जाची छाननी सुरू आहे. या योजनेत जानेवारी महिन्याचे पैसे लाडक्या बहिणींना २६ जानेवारी पूर्वी दिले जातील, असंही आदिती तटकरे यांनी सांगितलं.

****

दरम्यान, लाडकी बहिण योजनेसाठी पात्र महिलांना योजनेचा लाभ मिळावा, हीच शासनाची भूमिका असल्याचं, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटलं आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथे पत्रकार परिषदेत बोलत होते. मराठवाड्यात उद्योग क्षेत्रात मोठी गुंतवणूक होत असून रोजगारांच्या संधी मोठ्या प्रमाणावर वाढणार असल्याचं शिरसाट यांनी सांगितलं.

****

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ–बीसीसीआयने आगामी आयसीसी अजिंक्यपद चषकासाठीच्या संघाची घोषणा केली आहे. कुलदीप यादव आणि मोहम्मद शमीची वर्णी लागलेल्या या संघाचं कर्णधारपद रोहित शर्मा याच्याकडे असून, शुभमन गीलकडे उपकर्णधारपद देण्यात आलं आहे. या स्पर्धेत भारताचे सर्व सामने दुबईत होणार आहेत. भारताचा पहिला सामना २० फेब्रुवारीला बांगलादेशाविरोधात होणार आहे. दरम्यान, या मालिकेसाठी दुबईला प्रस्थान करण्यापूर्वी भारतीय क्रिकेट संघाची इंग्लंड संघाविरोधात पाच टी ट्वेंटी आणि तीन एकदिवसीय सामन्यांच्या

मालिका होणार आहेत. २२ जानेवारीपासून १२ फेब्रुवारीपर्यंत हे सामने होणार आहेत.

****

खो–खो विश्वचषक स्पर्धेत भारतीय पुरुष आणि महिला संघांनी उपान्त्य फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य फेरीचे दोनही सामने आज होणार आहेत.

****

बीड इथं जिल्हास्तरीय सरस विक्री आणि प्रदर्शनाच्या तिसऱ्या दिवसापर्यंत पाच लाख ८० हजार रुपयांची विक्री झाली आहे. बचत गटांच्या महिलांनी तयार केलेले विविध मसाले, पापड, कुरडया, शेवया, शोभेच्या तसंच विविध गृहपयोगी वस्तू आणि खाद्यपदार्थांना नागरिक आणि महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळात आहे. या प्रदर्शनात विविध वस्तू आणि खाद्यपदार्थांचे एकशे सोळा स्टॉल लावण्यात आले आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वाहतूक शाखेच्या पोलीसांकडून रस्ता सुरक्षा अभियान राबवलंजात आहे. आज या अभियानांतर्गत गंगापूर– वैजापूर मार्गावर ऊस वाहतुक करणाऱ्या वाहन धारकांना पोलिसांनी वाहतूक सुरक्षेबाबत प्रात्यक्षिकासह माहिती दिली. या अभियानात वाहतूक शाखेचे पोलीस निरिक्षक केदारनाथ पालवे यांच्यासह पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते.

****

शेतकरी कर्ज माफीसाठी आज परभणी जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला, परभणी – ताडकळस – पालम महामार्गावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे किशोर ढगे यांच्या उपस्थितीत रस्ता रोको आंदोलन करण्यात आलं, त्यानंतर गोदावरी नदी पात्रात उतरूनही आंदोलकांनी निदर्शनं केली. राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्याशी फोन वरून संवाद झाल्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

लातूर जिल्ह्याच्या निलंगा तालुक्यात वाडीशेडोळचे सरपंच रूबाब शेख यांना मारहाण झाल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी निलंगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला, विद्युत खांब रोवण्याच्या वादावरून हा प्रकार झाल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

✻✻✻✻